Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ. स. नं. ८३२-ए, फायनल प्लॉ.नं. १७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४.

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 I EPABX -25705000 I
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र. रा.मं./परीक्षा–३/४२०२
पुणे ४११००४
दिनांक :– २७/०९/२०२३

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

विषय :– माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र(इ.१२वी) परीक्षा फेब्रु–मार्च २०२४ च्या परीक्षेस खाजगी विद्यार्थी म्हणून प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीने विलंब व अतिविलंब शुल्काने स्विकारण्याबाबत.

संदर्भ :– १) या कार्यालयाचे पत्र क्र. रा.मं./परीक्षा–३/३४६७, दिनांक ०८/०८/२०२३.
२) या कार्यालयाचे पत्र क्र. रा.मं./परीक्षा–३/४१०८, दिनांक १३/०९/२०२३.

उपरोक्त विषयाचे संदर्भादिन पत्रास अनुसरुन कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र(इ.१२वी) परीक्षा फेब्रु–मार्च २०२४ च्या परीक्षेस खाजगी विद्यार्थी म्हणून प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीने नियमित शुल्काने स्विकारण्याचा कालावधी दि. ३० सप्टेंबर २०२३ पर्यंत निश्चित करण्यात आला आहे.

नियमित शुल्काने नावनोंदणी अर्ज सादर करण्याची निर्धारीत मुदत संपल्यानंतर खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज विलंब शुल्काने व अतिविलंब शुल्काने ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्याच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या आहेत. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्यासाठी खालील वेबसाईटचा वापर करावा. अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर मराठी/इंग्रजीमधून उपलब्ध आहेत. सदर सूचना वाचून अर्ज भरण्यास सुरुवात करावी.

**संकेतस्थळ – इ. १० वी – http://form17.mh-ssc.ac.in**
**इ. १२ वी – http://form17.mh-hsc.ac.in**

**विलंब शुल्कासह निर्धारीत मुदत**

| विलंब शुल्क | | अतिविलंब शुल्क |
|---|---|---|
| इ. १० वी | इ. १२ वी | इ. १०वी व इ. १२वी |
| प्रति विद्यार्थी रु. १००/– स्वीकारुन नावनोंदणी अर्ज भरावयाच्या तारखा | प्रति विद्यार्थी रु. २५/– स्वीकारुन नावनोंदणी अर्ज भरावयाच्या तारखा | प्रति विद्यार्थी प्रतीदिन रु. २०/– स्वीकारुन नावनोंदणी अर्ज भरावयाच्या तारखा |
| मंगळवार दि. ०३/१०/२०२३ ते रविवार दि. १५/१०/२०२३ | | सोमवार दि. १६/१०/२०२३ ते मंगळवार दि. ३१/१०/२०२३ |



Scanned with OKEN Scanner

१. विलंब शुल्कासह प्राप्त झालेले नावनोंदणी अर्ज विहीन शुल्क व मूळ कागदपत्रांसह त्यावर LATE FORM शेरा लिहून शुक्रवार दि. २०/१०/२०२३ रोजी तसेच अतिविलंब शुल्कासह प्राप्त झालेले नावनोंदणी अर्ज विहीत शुल्क व मूळ कागदपत्रांसह त्यावर SUPERLATE FORM शेरा लिहून शुक्रवार दि. ०३/११/२०२३ रोजी माध्यमिक शाळांनी व कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाकडे हस्तपोच जमा करावेत. यासंदर्भातील सूचना लेखा शाखेला देण्यात याव्यात.

२. यापूर्वी ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरुनही नावनोंदणी अर्ज विहीत शुल्क व मूळ कागदपत्रांसह जमा न केलेल्या विद्यार्थ्यांस अर्ज भरुन सर्व विहीत प्रक्रिया करणे अनिवार्य राहील.

३. खाजगी विद्यार्थी नावनोंदणीकरीता विलंब व अतिविलंब शुल्काने अर्ज करण्याची मुदत मंगळवार, दि. ३१/१०/२०२३ पर्यंत असणार आहे. त्यानंतर मुदतवाढ दिली जाणार नाही, याची सर्व संबंधित घटकांनी नोंद घेण्याबाबत विभागीय मंडळ स्तरावरुन सूचित करण्यात यावे.

४. विभागीय मंडळास प्राप्त झालेल्या खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्जाची तपासणी शुक्रवार दि. १७/११/२०२३ पर्यंत करावी व त्यातील पात्र/अपात्र विद्यार्थ्यांची यादी तयार करुन ऑनलाईन शाखा, राज्य मंडळ यांचेकडे http://division.mh-ssc.sc.in या पोर्टलवर तसेच या stateboardonline@gmail.com या ई–मेलवर सादर करावी.

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे – ४.

प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी –

१. व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्यमंडळ, पुणे.
२. समन्वयक ऑनलाईन विभाग, राज्यमंडळ, पुणे.
३. लेखाधिकारी, राज्य मंडळ, पुणे.
४. अंस्वीस, सस्वीस, राज्य मंडळ, पुणे.

पत्र कमाक / ना.वि.म. / प.मा. व प.उ.मा. / 3227
दिनांकः– 03 / 10 / 2023

प्रति,
मुख्यध्यापक / प्राचार्य.
भंडारा, चंद्रपुर, नागपूर, वर्धा, गडचिरोली, गोंदिया.

नागपूर विभागीय मंडळाचे कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये यांनी उपरोक्त प्रकटनाचे (फार्म नं.–17 ऑनलाईन पध्दतीने विलंब व अतिविलंब शुल्काने स्किारण्याबाबत) कृपया अवलोकन करून यथानियम कार्यवाही करण्यांत यावी. तसे संबंधितास आपले स्तरावरून कळविण्यात यावे. खाजगी विद्यार्थी विलंब / अतिविलंब शुल्काने नावनोंदणी करण्याकरीता अंतिम मुदत ही दि. 31 / 10 / 2023 असणार आहे. यानंतर मुदतवाढ दिली जाणार नाही, याची सर्व संबंधितानी नोंद घेवून उचित कार्यवाही करावी.

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

Scanned with OKEN Scanner